कार्यावली

सोमवार, दिनांक २४ जुलै २०१७ रोजी दुपारी १२-०० वाजता मुंबई येथील विधान भवनात सुरू होणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१७ च्या तृतीय (पावसाळी) अधिवेशनाची कार्यावली.

एक : सभापतींनी, सभापती-तालिका नामनिर्देशित करणे.

दोन : प्रश्नोत्तरे.

तीन : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

चार : सन २०१७-२०१८ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

पाच : सन २०१७-२०१८ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा.

सहा : लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे.

सात : सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे.

आठ : अंदाज समितीचे अहवाल सादर करणे.

नऊ : अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

दहा : पंचायती राज समितीचे अहवाल सादर करणे.

अकरा : मंत्र्यांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

बारा : **शासकीय विधेयके. (गत सत्रातील प्रलंबित)**

विधानसभेने संमत केलेली खालील विधेयके विधानपरिषदेकडे प्रलंबित :—

(१) " सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २—मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७. "

(२) " सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४—मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७. "

(३) " सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १०—भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७. "

(४) " सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १२—शिकाऊ उमेदवार (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७. "

(५) " सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १६—महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७. "

(६) " सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २०—भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७. "

(७) " सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २४—महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) (सुधारणा) विधेयक, २०१७. "

तेरा : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

चौदा : शोक प्रस्ताव.

पंधरा : इतर प्रस्ताव.

सोळा : तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा—म.वि.प.नियम ९७ अन्वये.

सतरा : तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधणे—म.वि.प.नियम १०१ अन्वये.

अठरा : **अशासकीय विधेयके - विचारार्थ -**

(१) सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ११—बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१३—श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांचे.

(२) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक ११—मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१४ - श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(३) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १२—महाराष्ट्र स्त्रियांची छेडछाड करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०१४ - श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(४) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १३—बियाणे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(५) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १४—महाराष्ट्र शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०१४—श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(६) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १५—कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(७) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १६—महाराष्ट्र बेकारी निर्मूलन विधेयक, २०१४—श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(८) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १७—मुंबई दारूबंदी (सुधारणा) विधेयक, २०१४—श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(९) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १८—हिंदू अज्ञानत्व व पालकत्व (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४—श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(१०) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १९—महाराष्ट्र हिंसाचार व लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०१४ - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(११) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक २०—भ्रष्टाचार प्रतिबंध (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४—श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(१२) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक २१—महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, २०१४—श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(१३) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक २२—फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४—श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(१४) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक २३—बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४—श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(१५) सन २०१५ चे वि.प.वि. क्रमांक १—महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (सुधारणा) विधेयक, २०१५—श्री. संजय दत्त, वि.प.स. यांचे.

(१६) सन २०१५ चे वि.प.वि.क्रमांक २—महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१५—श्री.संजय दत्त, वि.प.स. यांचे.

(१७) सन २०१५ चे वि.प.वि.क्रमांक १४—महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसीए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण विधेयक,२०१५—श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचे.

(१८) सन २०१५ चे वि.प.वि. क्रमांक १५—महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) (सुधारणा) विधेयक, २०१५—श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचे.

(१९) सन २०१६ चे वि.प.वि. क्रमांक २—महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०१६ —श्री. ख्वाजा बेग, वि.प.स. यांचे.

(२०) सन २०१६ चे वि.प.वि. क्रमांक ६—महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६—श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचे.

(२१) सन २०१७ चे वि.प.वि. क्रमांक १—महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक वयोमर्यादा विधेयक, २०१७ —श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स. यांचे.

(२२) सन २०१७ चे वि.प.वि. क्रमांक २—मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७—श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स. यांचे.

(२३) सन २०१७ चे वि.प.वि. क्रमांक ३—महाराष्ट्र शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०१७—श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स. यांचे.

(२४) सन २०१७ चे वि.प.वि. क्रमांक ४—महाराष्ट्र स्वयंसेवी संस्था विकास व व्यवस्थापन महामंडळ विधेयक, २०१७—श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स. यांचे.

एकोणीस : **अशासकीय ठराव (म.वि.प. नियम १०२).**

श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १, २, ३, ४ व ५

(१) " राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारी समस्या परिणामकारक पद्धतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वंयरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(२) " राज्यात पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी पर्यटकांसाठी मार्गदर्शक नेमणे व अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन त्या माध्यमातून तेथील युवकांना रोजगार उपलब्ध करणे यासाठी राज्यातील सर्व पर्यटन स्थळांचे महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(३) " राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्ग येथे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरू करणे, सदरची उपचार केंद्रे सुरु झाल्यास तेथे वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी यांची नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळून राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होईल तसेच अपघातग्रस्तांना वेळीच उपचार होतील. म्हणून राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(४) " राज्यातील खेळांडूची राष्ट्रीयस्तरावर होत असलेली पिछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्रांना आवश्यक ते क्रीडा साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(५) " कोकणातील विशेषत: रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व ठाणे या चार जिल्ह्यांसाठी एक स्वतंत्र मत्स्य विद्यापीठ स्थापन करून त्यात मत्स्यव्यवसायासंबंधी विविध अभ्यासक्रम अंतर्भूत करावेत,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६, ७, ८, ९ व १०

(६) " राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असणे, या कारखान्यातील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषत: कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाश्यांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवाच्या जिविकेच्या साधनांवर होणारा विपरित परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषण समस्येवर उपाय शोधून जलप्रदुषणास प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७) " राज्यात व विशेषत: पुणे शहरातील जीवनावश्यक वस्तूंच्या बेसुमार वाढत चाललेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यास शासनास आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या काळात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून या वस्तू बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करून जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८) " राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगारा अभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पद्धतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वंयरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(९) " सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी हजारो किलोमीटर लांबीचे बांधण्यात आलेले धूप प्रतिबंध बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी जमिनीत शिरुन मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे त्यामुळे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या तीनही जिल्ह्यांतील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखून त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१०) " राज्यातील शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव

शेतकऱ्यांना मिळण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ११, १२, १३, १४ व १५

(११) “ राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी-सुविधाही उपलब्ध करून दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्यावेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू होणे, अनेक जण गंभीर जखमी होणे, या घटना क्लेशदायक असल्याने राज्यातील धार्मिक स्थळाच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याच्यादृष्टीने तशा योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(१२) “ राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणामुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(१३) “ राज्यातील महिला व बाल विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करून अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौद्धिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(१४) “ शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(१५) “राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जाणे, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर तात्काळ बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

श्री. सुनिल तटकरे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १६, १७, १८, १९ व २०

(१६) " कोकणातील भूभागांपैकी सुमारे ५३.४५ टक्के पडित असलेल्या जमिनीत आंबा, काजू, सुपारी, कोकम, नारळ इ.फळांची लागवड आणि साग, शिसम, ऐन, किंजळ, खैर इ. वृक्षांची वनराईची पद्धतशीर लागवड करण्याच्या दृष्टीने धडक कार्यक्रम हाती घेऊन या कार्यक्रमासाठी आर्थिक तरतूद व अन्य उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१७) " नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ अशी नैसर्गिक आपत्ती असूनही पीक विमा नुकसानभरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहणे, याला शंभर वर्षे जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१८) " कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांची वाढती संख्या विचारात घेता कोकणात रेल्वे मार्ग दुपदरी (सेकंड ट्रॅक) करावा तसेच या रेल्वे मार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांसाठी पत्र्याची कायमस्वरूपी शेड उभारण्यात यावी, महिला प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेता तेथे सुलभ शौचालय व अन्य अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याकरिता शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१९) " कोकणातील आंबा, काजू इत्यादि पिकांचे नैसर्गिक आपत्तीमुळे फार मोठ्या प्रमाणात होणारे नुकसान लक्षात घेता अन्नधान्य, गळीतधान्य, तेलबिया इत्यादी पिकांसाठी केंद्र शासनामार्फत पुरस्कृत करण्यात आलेली सर्वंकष पिंक बिया योजना ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील आंबा, काजू इत्यादी फळपिकांना लागू करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(२०) " शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २१, २२, २४ व २५

(२१) " केंद्र सरकारने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली असणे, त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व

मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरू कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(२२) “ राज्यातील सर्व विद्यार्थ्यांनी घ्यावयाचे सर्व माध्यमातील शिक्षण हे अधिक परिणामकारक व प्रभावी होण्यासाठी व भविष्यात सक्षम पिढी उभी राहण्यासाठी शिक्षणाशी संबंधित सर्व विभाग जसे (शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, आश्रमशाळा, अंध शाळा, अपंग व मूक-बधिरांच्या शाळा, आदिवासी आश्रम शाळा) हे एकाच मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखाली आणावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(२४) “ शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा या महाविद्यालयामार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत दिली जाते, त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(२५) “ राज्यात सातत्याने वाढणारी लोकसंख्या, त्याप्रमाणात वाढणारी वाहनांची संख्या, होणारे दररोजचे अपघात, त्यामुळे होणारी जीवितहानी हे टाळण्यासाठी राज्यातील सर्व राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्ग तसेच जिल्ह्यांना जोडणारे रस्ते हे चौपदरी करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २६, २७, २८ व २९

(२६) “ राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पद्धतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(२७) “ राज्यात महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करित असलेल्या हजारो अल्पवयीन विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसणे, त्यामुळे त्यांचा शारीरिक व बौद्धिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(२८) “ शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत दिली जाते, त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(२९) " राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जाणे, परिणामी तरुण पिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर तात्काळ बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

ॲड. राहुल नार्वेकर, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३१, ३२ व ३४

(३१) " महाराष्ट्र राज्याला ७२० कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभला असून तो मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना स्पर्शून जात असणे, सदर जिल्ह्यातील जनतेचे मासेमारी हे पारंपरिक प्रमुख उत्पन्नाचे व जीविताचे साधन असताना राज्य शासनाचे मत्स्य विद्यापीठाचे मुख्यालय नागपूर येथे असणे हे या जिल्ह्यांना सोईचे ठरत नसल्यामुळे मत्स्य विद्यापीठाचे मुख्यालय कोकणात असावे अशी शिफारस तत्कालीन खासदार डॉ.भालचंद्र मुणगेकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केली होती, त्या शिफारसीची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(३२) " राज्यातील ग्रामीण भागातील प्राथमिक, माध्यमिक तसेच आदिवासी आश्रम शाळांमधील शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेला दर्जा, अनेक शाळांमध्ये अपूरे शिक्षक वर्ग, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना क्रीडांगणे, प्रयोग शाळा, संगणक, ग्रंथालय व इतर शैक्षणिक सोईसुविधा उपलब्ध करून देण्याची नितांत आवश्यकता, याप्रकरणी अमुलाग्र सुधारणा करण्यासाठी एक कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(३४) " ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील विद्यार्थी संख्या विचारात घेता त्यांना शैक्षणिक कामांसाठी वारंवार मुंबईला यावे लागणे, तसेच त्या भागातील आदिवासी लोकसंख्या, डोंगराळ व दुर्गम भाग विचारात घेता कोकण प्रदेशासाठी एक स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

श्री. आनंद ठाकूर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ३५, ३६, ३७ व ३८

(३५) " पालघर हा आदिवासी जिल्हा असल्याने जिल्ह्यातील आदिवासींचा विकास साधण्याच्या दृष्टीने डहाणू, कासा, जव्हार, मोखाडा, नाशिक या रेल्वे मार्गाचे काम हाती घेण्यासाठी कोकण रेल्वे महामंडळाच्या धर्तीवर एक स्वायत रेल्वे महामंडळ स्थापन करून हा रेल्वे मार्ग विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाने केंद्रशासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(३६) " पालघर जिल्ह्यातील मोखाडा, जव्हार, विक्रमगड, वाडा, तलासरी, डहाणू, पालघर आणि वसई या बहुसंख्य गावांत विशेतः उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरूपी दूर करण्यासाठी शासनाने एक कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(३७) " पालघर जिल्ह्यात तसेच डहाणू, जव्हार या भागांत इयत्ता १२ वी नंतर पदवी, पदव्युत्तर शिक्षणाची सोय नसल्यामुळे विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणासाठी होत असलेली परवड, ज्या विद्यार्थ्यांना मेडिकल, इंजिनिअरींग, लॉ, आयटीआयसाठी प्रवेश घेण्याची इच्छा आहे त्यांना पालघर, मुंबई या ठिकाणी जावे लागणे, परिणामी स्थानिक विद्यार्थ्यांचे होणारे हाल विचारात घेता, उक्त तालुक्यातील विद्यार्थ्यांची परवड थांबविण्यासाठी या ठिकाणी उच्च महाविद्यालय, इंजिनिअरींग, फार्मसी, नर्सिंग, सर्वेअर, वैद्यकीय, कायदे यासंदर्भात गुणवत्तापूर्ण महाविद्यालये स्थापन होण्यासाठी राज्यशासनाने काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(३८) " राज्यात ४१७ ठिकाणी सरकारी आयटीआय उपलब्ध असून तेथे १७८ एवढेच कोर्सेस चालविले जात असणे, मात्र त्यातील अनेक कोर्सेस हे कालबाह्य झालेले असणे, विविध क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञान आले असतानाही जुन्याच तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण दिले जात असणे, आयटीआय प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञानात नवीन कोर्सेसची भर पडण्यासाठी गरजेनुसार नवीन कोर्सेस सुरू करण्याची आवश्यकता असणे, यासाठी राज्य शासनाने काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

श्री. सतिश चव्हाण, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३९, ४०, ४१, ४२ व ४३

(३९) " राज्यातील ग्रामीण भागातील जिल्हापरिषद शाळांची झालेली दयनीय अवस्था विचारात घेऊन शाळांसाठी कंपाऊंड वॉल, पाण्याची सुविधा, मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, वृक्षारोपण यासाठी महाराष्ट्र शासनाने जिल्हापरिषदांना आवश्यक तो विशेष निधी देण्याच्या दृष्टीने कारवाई करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४०) " राज्यात दिवसेंदिवस वाढत चाललेली महागाई तसेच सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी करूनही सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी प्राप्त होत नसणे, सेवायोजन कार्यालयाकडून सन १९८५ पासून नोकरीसाठी मुलाखत पत्र देण्यात येत नसल्याने बेरोजगारांना चरितार्थासाठी कोणतेही साधन उपलब्ध न झाल्याने चरितार्थ चालविणे जिकरीचे झाले असणे, म्हणून पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील ३ वर्षांत नोकरी न

मिळालेल्या बेरोजगारांना आर्थिक मदत म्हणून प्रतिमहा रुपये १,५०० बेकार भत्ता देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(४१) “ राज्यातील खेळांडूची राष्ट्रीयस्तरावर होत असलेली पिछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू तयार होण्याकरिता तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्रांना आवश्यक ते क्रीडा साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(४२) “ राष्ट्रीयस्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परिक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पद्धतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(४३) “ केंद्र सरकारने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली असणे, त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरू कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

श्री. रामराव वडकुते, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४४, ४५, ४६, ४७ व ४८

(४४) “ राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(४५) “ राज्यात महापूर, दुष्काळ, चक्रीवादळ, गारपीट, भूकंप वगैरे नैसर्गिक संकटांना तोंड देण्यासाठी व बाधित नागरिकांना त्वरेने पुरेसे अर्थसहाय्य करण्यासाठी तसेच अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा निधी गोळा करणे व आपतग्रस्तांचे पुनर्वसन विनाविलंब होण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(४६) " दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबाचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळ्या रंगांच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्यरेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(४७) " राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधीअभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने ह्या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(४८) " शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, कीटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

श्री. ख्वाजा बेग, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४९, ५०, ५१, ५२ व ५३

(४९) " विदर्भातील निम्न पैनगंगा, बेंबळा प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(५०) " राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपाचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरिता होणारा विलंब त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या ऊस पिकांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त

योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(५१) “ शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(५२) “ विदर्भात नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असूनही पीक विमा नुकसानभरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(५३) “ पावसाची अनियमितता, निसर्गाचा लहरीपणा, त्यामुळे निर्माण होणारी भीषण पाणीटंचाई परिणामी पिण्याच्या पाण्यासाठी सुद्धा होणारी भटकंती ही अतिशय गंभीर बाब असणे, त्यावर जलतज्ञांच्या मार्गदर्शनातून शासनाने वेगवेगळ्या उपाययोजना करण्याची आवश्यकता, रेन वॉटर हार्वेस्टींग हे त्यापैकी एक असणे, परंतु याबद्दलची अंमलबजावणी होताना दिसत नसणे, महाराष्ट्रातील सर्व शासकीय इमारतींच्या छतावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे एकत्रीकरण (रेन वॉटर हार्वेस्टींग) करून त्याचे इमारतीच्या आवारातील जमिनीत पाण्याच्या स्त्रोताजवळ पुनर्भरण करण्याची आवश्यकता असणे, यामुळे जलस्त्रोत रिचार्ज होऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल. यासाठी कठोर निर्देश द्यावेत, तसेच खाजगी नवीन इमारत बांधकाम करीत असताना बांधकाम परवाना देण्यासाठी जसे इतर बाबी तपासण्यात येतात तसेच (ग्रामपंचायत ते महानगरपालिका) त्या इमारतीवरील छताचे पाणी त्या आवारातील जलस्त्रोतात सोडण्याचे नियोजन आहे किंवा कसे हे तपासूनच बांधकाम परवाना द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

श्रीमती विद्या चव्हाण वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५५ व ५६

(५५) “ राज्यात ज्याप्रमाणे जिल्हापरिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांचे विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर करण्यात येत असलेले वार्षिक प्रशासन अहवाल व मुख्य लेखा परिक्षक व स्थानिक निधी लेखा यांचे महाराष्ट्राच्या लेख्यावरील लेंखापरिक्षा पुर्नविलोकन

अहवाल तपासण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाची "पंचायती राज समिती" गठीत करण्यात आली आहे, त्याच धर्तीवर राज्यातील महानगरपालिका तसेच अ, ब व क वर्गातील नगरपालिका व नगरपरिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवाल व लेखा अहवालाची तपासणी करून त्याबाबतचा अहवाल सभागृहाला सादर करण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची समिती गठीत करण्यात यावी; अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे. "

(५६) "केंद्र सरकारचे हवामान खाते आणि त्यांच्या वेधशाळा नैऋत्य मान्सुन पावसाचा अंदाज वर्तविण्याचे काम करतात, मान्सुन पाऊस सुरु होण्याच्या अगोदर हवामान खात्याने तारखा जाहीर करणे, परंतु मान्सुनचा पाऊस त्या तारखांना राज्यात सुरु न होणे, त्यामुळे शेतकऱ्यांना दुबार पेरणीची वेळ येणे, मुंबईतील हवामान खात्याने पाऊस पडण्याची दिलेली तारीख आणि पुणे वेधशाळेने दिलेल्या तारखेत फरक असणे, पाऊस आणि इतर हवामानाचा विकसीत देशात देण्यात येणारा अचुक अंदाजामागे त्यासाठी वापरण्यात येणारे आधुनिक तंत्रज्ञान हे कारण असणे, हवामानाचा अचुक अंदाज शेतकऱ्यांना देण्यासाठी राज्य शासनाने आधुनिक तंत्रज्ञान वापरुन परिपूर्ण विस्तारित व्यवस्था निर्माण करण्याची शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

डॉ. अपूर्व हिरे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५९, ६०, ६१ व ६२

(५९) "राज्यातील शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(६०) "राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपाचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरिता होणारा विलंब त्यामुळे पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या ऊस पिकांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(६१) "पावसाची अनियमितता, निसर्गाचा लहरीपणा, त्यामुळे निर्माण होणारी भीषण पाणीटंचाई परिणामी पिण्याच्या पाण्यासाठी सुद्धा होणारी भटकंती ही अतिशय गंभीर बाब झाली असणे, त्यावर जल तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून वेगवेगळे उपाययोजना करण्याची आवश्यकता, उदा. रेन वॉटर हार्वेस्टींग, परंतू याबद्दलची अंमलबजावणी होताना दिसत नसणे, महाराष्ट्रातील

सर्व शासकीय इमारतींच्या छतावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे एकत्रीकरण (रेन वॉटर हार्वेस्टींग) करून त्याचे इमारतीच्या आवारातील जमिनीत पाण्याच्या स्त्रोताजवळ पुनर्भरण करण्याची आवश्यकता असणे, यामुळे जलस्त्रोत रिचार्ज होऊन पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल, यासाठी शासनाने कठोर निर्देश द्यावेत, तसेच खाजगी नवीन इमारत बांधकाम करीत असताना बांधकाम परवाना देण्यासाठी इतर बाबी तपासण्यात येतात त्याचप्रमाणे (ग्रामपंचायत ते महानगरपालिका) त्या इमारतीवरील छताचे पाणी त्या आवारातील जलस्त्रोतात सोडण्याचे नियोजनाबाबत केलेली तरतूद तपासूनच बांधकाम परवाना द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६२) " नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ अशा नैसर्गिक आपत्ती असूनही पीक विमा नुकसानभरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६३, ६६, ७४, ७६ व ८१

(६३) " राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असणे, या कारखान्यातील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच विदर्भातील नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झालेले असणे, त्यामुळे रहिवाश्यांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवाच्या उपजिविकेच्या साधनांवर होणारा विपरित परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदुषण समस्येवर उपाय शोधून जल प्रदूषणास प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(६६) " राज्यातील सर्व धर्मादाय शैक्षणिक संस्थांचे योग्य प्रशासन व नियोजन होण्याची आवश्यकता असणे, म्हणून सदर संस्थाचा कारभार पाहण्यासाठी स्वतंत्र शैक्षणिक धर्मादाय आयुक्तालयाची निर्मिती करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(७४) " राज्यातील समाजकल्याण, आदिवासी विकास विभाग आणि महिला व बालकल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करून अध्ययन करीत असलेल्या विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत

नसल्यामुळे त्यांच्या शारीरिक व बौद्धीक विकासावर विपरीत परिणाम होत असल्याने या सर्व विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम तयार करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(७६) “ राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचारांबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र फास्ट ट्रॅक न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(८१) “ राज्यात विशेषतः ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी हजारो किलोमीटर लांबीचे बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेकवेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी जमिनीत शिरून शेतीचे व झाडांचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या पाचही जिल्ह्यातील किनारपट्टीवरील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

श्री. संजय दत्त, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६५, ६७, ६८ व ७५

(६५) “ राज्यातील पोलिसांना २४ तासांहून अधिक तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढणे, तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाड्याचाच घरात रहावे लागत असणे, शासनाकडून देण्यात आलेल्या शासकीय निवासस्थानाची अत्यंत दुरवस्था असणे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न, यामुळे त्यांच्यात निर्माण होत असलेले तणावाचे व नैराश्याचे वातावरण, परिणामी त्यांच्यावर मानसिक ताण वाढत असून त्यांच्यात आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असणे, पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होऊन त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी व निवासस्थाने इत्यादी मूलभूत समस्यांबाबत कायमस्वरुपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(६७) “ मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळ्यात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची

योग्यरित्या पाहणी करून त्यांचा विकास करणे, पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठ्या प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करून त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(६८) " राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तीर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करून दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू होणे, यामध्ये अनेकजण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने तशा योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(७५) " राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पद्धतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ७०, ७१, ७२ व ७३

(७०) " भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) अन्वये राज्यातील मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रासाठी यापूर्वी स्थापन करण्यात आलेल्या वैधानिक विकास महामंडळाच्या धर्तीवर कोकण प्रदेशासाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत राज्य शासनाने कार्यवाही करून त्याबाबत केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(७१) " ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांची संख्या जास्त असून व त्यांना शैक्षणिक कामांसाठी वारंवार मुंबईला जावे लागणे, तसेच त्या भागातील आदिवासी लोकसंख्या डोंगराळ व दुर्गम भाग विचारात घेता, कोकण प्रदेशासाठी एक स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(७२) " राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी तरुणांमध्ये निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकांसारख्या आर्थिक संस्थांकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबांतील व्यक्तींना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी व सुशिक्षित बेरोजगारांना पुन्हा सुशिक्षित बेरोजगार भत्ता सुरू करण्यात यावा, तसेच रोजगारासाठी भाग भांडवलाची सोय करावी त्याचप्रमाणे निवडणूक, जनगणनाविषयक कामे शिक्षकांना देण्याऐवजी सुशिक्षित बेरोजगारांना देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(७३) " राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परिक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे प्रमाण अल्प असणे, हे प्रमाण अधिकरित्या वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत पद्धतीने योग्य प्रकारे पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

श्री. अशोक उर्फ **भाई जगताप, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ७७, ७८, ७९ व ८०**

(७७) " राज्यातील विनाअनुदान तत्त्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होत नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(७८) " राज्यातील पोलिसांना २४ तासांहून अधिक तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढणे, तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाड्याच्याच घरात रहावे लागत असणे, शासनाकडून देण्यात आलेल्या शासकीय निवासस्थानाची अत्यंत दुरवस्था असणे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न, यामुळे त्यांच्यात निर्माण होत असलेले तणावाचे व नैराश्याचे वातावरण, परिणामी त्यांच्यावर मानसिक ताण वाढत असून त्यांच्यात आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असणे, पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होऊन त्यांच्या

कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी व निवासस्थाने इत्यादी मूलभूत समस्यांबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(७९) “ राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(८०) “ राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणावर स्थानिक भूमीपूत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपूत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपूत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भूमीपूत्रांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमीपूत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ८३, ८४, ८५, ८६ व ८७

(८३) “ राज्यात बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरूपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(८४) “ राज्यातील ऊसतोड कामगार ऊस तोडणीसाठी वर्षातील ८ महिने घराबाहेर राहत असणे, त्यामुळे त्यांच्यासोबत त्यांचे संपूर्ण कुटुंबही ऊस तोडणीसाठी स्थलांतरीत होत असल्यामुळे त्यांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असणे, या ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्यातील प्रत्येक तालुक्यात ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी निवासी शाळा सुरू करण्याची आवश्यकता असणे, ऊस तोडणी कामगारांच्या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी शासकीय

वसतिगृहांमधून निवासाची व भोजनाची व्यवस्था करणे, तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या धर्तीवर ऊसतोडणी कामगारांच्या मुलांना शाळा, महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(८५) " राज्यातील सर्व न्यायालयांचे कामकाज १०० टक्के मराठी भाषेतून होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(८६) " महाराष्ट्र राज्य हे प्रगतशील राज्य असून राज्यातील शेतकरी व शेतमजूर उत्पादन वाढवून मेहनतीने व कष्टाने घाम गाळून शेतीची मशागत करून राज्याच्या विकासात हातभार लावतो व राज्याला प्रथम क्रमांकावर आणण्यात त्याचा महत्त्वाचा सहभाग असणे, परंतु राज्यात अवकाळी पाऊस, दुष्काळ व नैसर्गिक आपत्ती आल्यामुळे शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढले असून त्यांचे एकूणच जीवन जगणे कठीण झालेले असणे, म्हणून राज्यातील शेतकऱ्यांना किमान रु. २००० प्रति महिना निवृत्तिवेतन देण्याची योजना सुरू करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(८७) " राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळांडूचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरु व तरुण खेळाडूंना देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित करून त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरीता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

श्री. नागोराव गाणार, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ९१ व ९२

(९१) " राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(९२) " राज्यात दिवसेंदिवस वाढत चाललेली महागाई तसेच सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी करूनही सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी प्राप्त न होणे, सेवायोजन कार्यालयांकडून सन १९८५ पासून नोकरीसाठी मुलाखत पत्र देण्यात येत नसणे, बेरोजगारांना चरितार्थासाठी कोणतेही साधन उपलब्ध न झाल्याने चरितार्थ चालविणे जिकरीचे झाले आहे, म्हणून पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील ३ वर्षांत नोकरी न मिळालेल्या बेरोजगारांना

आर्थिक मदत म्हणून प्रतिमाह रुपये १५०० निर्वाहभत्ता देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ९३, ९४, ९५ व ९६

(९३) '' ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेकवेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी जमिनीत शिरुन मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची तीव्रता वाढत असणे, परिणामी लोकांच्या मालमत्तेचे त्यामुळे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या चारही जिल्ह्यांतील किनाऱ्यावरील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(९४) '' कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्या दृष्टीने पाण्याची निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे वीजनिर्मितीनंतर वशिष्ठ नदीच्या (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी वापरण्याची आवश्यकता, कोकणातील जिल्ह्यांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या पाण्याची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने चिपळूण तालुक्यातील वशिष्ठ नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून (लिफ्टींग) निसर्गाच्या गुरुत्वाकर्षणाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरीता एक खास कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युद्धपातळीवर अंमलबजावणी करावी,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९५) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करून अध्यायन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसणे, त्यामुळे त्यांचा शारीरिक व बौद्धिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९६) '' राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचारांबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी स्वतंत्र फास्ट ट्रॅक न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

श्री. सुभाष झांबड, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ९८, ९९, १०० व १०१

(९८) " राज्यात दिवसेंदिवस वाढत चाललेली महागाई तसेच सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी करूनही सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी प्राप्त होत नसणे, सेवायोजन कार्यालयाकडून सन १९८५ पासून नोकरीसाठी मुलाखत पत्र देण्यात येत नसणे, परिणामी बेरोजगारांना चरितार्थासाठी कोणतेही साधन उपलब्ध नसल्याने चरितार्थ चालविणे जिकरीचे झाले असणे, म्हणून पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील तीन वर्षांत नोकरी न मिळालेल्या बेरोजगारांना आर्थिक मदत म्हणून प्रतिमहा रुपये १५०० बेकारी भत्ता देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(९९) " राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पद्धतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१००) " विदर्भातील हातमाग, विणकरांच्या जटील बनत चाललेल्या विविध समस्या, तसेच त्यांची आर्थिक दुरवस्था व ते जगत असलेले हलाखीचे जीवन यात सुधारणा होण्याच्या दृष्टीने शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१०१) " राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करून अध्यायन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसणे, त्यामुळे त्यांचा शारीरिक व बौद्धिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १०४, १०५ व १०६

(१०४) " राज्यातील खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पिछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू तयार होण्यासाठी तालुकास्तरावर अद्ययावत क्रीडा प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यात यावीत, त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमून अशा केंद्राना आवश्यक ते क्रीडा साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१०५) " राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळांडूचे देशी खेळांकडे दुर्लक्ष झालेले असणे, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरू व तरुण खेळाडूंना देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित करून त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरिता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१०६) " राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करून अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौद्धिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

डॉ. सुधीर तांबे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १०७ व १०८

(१०७) " राज्यातील पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी सुमारे एक लाख अंगणवाड्यांची संख्या समाधानकारक असली तरी या अंगणवाड्यांद्वारे दर्जेदार पूर्व प्राथमिक शिक्षण मिळत नसणे, वैद्यकीय शास्त्रानुसार लहान मुलांच्या मेंदूची ९० टक्के वाढ ही सहा वर्षापर्यंत होते, विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक आवड निर्माण होणे, ज्ञानेंद्रियांचा योग्य विकास होणे, तसेच बौद्धिक विकासाच्या दृष्टीने हा कालावधी अत्यंत महत्त्वाचा असल्याने पूर्व प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम ठरविण्यासाठी तज्ञांची समिती गठीत करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१०८) " राज्यातील शेतकऱ्यांवर नेहमीच दुष्काळाची छाया पसरलेली असणे, कधी ओला दुष्काळ तर कधी सुका दुष्काळ ही परिस्थिती शेतकऱ्यांवर नेहमीच येत असणे, यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होतात व यातून त्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असणे, शासनाने राज्यातील दारिद्र्य रेषेखालील शेतकऱ्यांना निवृत्तीवेतन योजना सुरू करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १०९ व १११

(१०९) " चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी लागू करण्याचा घेण्यात आलेला निर्णय, या निर्णयाची जनमानसांत उमटलेली समाधानाची भावना, दारू सारख्या व्यसनामुळे व्यसनाधीन व्यक्तींचे उध्वस्त झालेले संसार, या व्यसनामुळे तरुण पिढी वाममार्गाला जात असल्याचे दिसून येणे, त्यांना त्यापासून परावृत्त करणे अशक्य असल्याचेही दिसून येणे, त्यामुळे या पिढीचे भवितव्य अंध:कारमय होणे, यावर उपाय म्हणून संपूर्ण राज्यात दारुबंदी धोरण अंमलात आणावे, अशी समाजाच्या विविध स्तरातून होत असलेली मागणी, या बाबी विचारात

घेता संपूर्ण राज्यात दारुबंदी धोरण राबविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(१११) “ राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर यासह बहुसंख्य शहरांची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत असणे, या शहरांच्या विविध भागात दरवर्षी वाढत असलेले कचऱ्याचे ढीग, कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची महानगरपालिकांकडील यंत्रणा अपूरी व कालबाह्य झालेली असणे, शहरांतील भागात साठणाऱ्या या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात महानगरपालिकांना येत असलेले अपयश, कचऱ्यांच्या ढीगांमुळे अनेक भागात रोगराई पसरुन नागरीकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, दुर्गंधी पसरल्यामुळे रस्त्यावरुन नागरीकांना जाणे-येणे मुश्किल होणे, महानगरपालिकांनी यावर परिणामकारक उपाययोजना आखण्याची आवश्यकता असतानाही त्यांचेकडून तशी कार्यवाही न होणे, नागरीकांच्या आरोग्यांशी हा प्रश्न निगडीत असल्यामुळे शासनस्तरावरुन यात लक्ष घालण्याची आवश्यकता विचारात घेता कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी परिणामकारक व कालबद्ध कार्यक्रम आखण्यात यावेत, असे आदेश सर्व महानगरपालिकांना शासनाने द्यावेत व त्यानुसार परिणामकारक अंमलबजावणी होते किंवा कसे याचा आढावा घेण्यासाठी शासनस्तरावर उच्चस्तरीय यंत्रणा निर्माण करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ११५, ११६, ११८ व ११९

(११५) “ राज्यातील सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण अपूर्ण असल्यामुळे गरजू लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी अडचणी येत असणे, दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित राहावे लागत असणे, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांसाठी शासनाने रु. १५,००० ही उत्पन्न मर्यादा ठरवलेली असणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे किमान रुपये ५०,००० उत्पन्न मर्यादा करण्याची गरज निर्माण झालेली असणे, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांसाठी उत्पन्न मर्यादेबाबतचा निकष सुधारित करण्यासाठी तसेच सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(११६) “ महाराष्ट्र राज्यातील न्यायालयीन कामकाज इंग्रजी भाषेत केले जात असणे, मात्र राज्यातील न्यायालयांमधील कामकाज मराठी या मातृभाषेतून करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा मराठी करण्याची आवश्यकता असल्याने भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद ३४८ (२) नुसार आवश्यक कार्यवाही करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(११८) "मुंबई विद्यापीठाचा 'वीरमाता जिजाऊ मुंबई विद्यापीठ' सोलापूर विद्यापीठाचा 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ' तर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा 'बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ' असा नामविस्तार करण्याची राज्यातील जनतेची मागणी असल्यामुळे राज्य शासनाने मागणीप्रमाणे या विद्यापीठांचा नामविस्तार करण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(११९) "महाराष्ट्र गुजरात सीमेवरील महाराष्ट्राच्या पाणलोट क्षेत्रातील काही पाणी दमणगंगा-पिंजाळ आणि पार-तापी-नर्मदा या नदी जोड प्रकल्पांद्वारे गुजरातला दिले जाणार असणे, मात्र महाराष्ट्राच्या पाणलोट क्षेत्रातील सर्वच्या सर्व पाणी महाराष्ट्र राज्याच्या वाट्याला मिळण्यासाठी राज्य शासनाने आवश्यक कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १२३, १२४, १२५, १२६ व १२७

(१२३) " राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विध्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विध्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पद्धतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१२४) " राज्यात ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधी अभावी बंद पडणे, योजनेचे व्यवस्थापन नीट होत नसणे, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१२५) " राज्यात विशेषतः ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी हजारो किलोमीटर लांबीचे बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी शेत जमिनीत शिरून शेतीचे व झाडांचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या चारही जिल्ह्यांतील किनारपट्टीवरील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखून त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१२६) " राज्यातील खेळाडुंची राष्ट्रीयस्तरावर होत असलेली पिछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू तयार होण्यासाठी तालुकास्तरावर अद्ययावत क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत, त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमून केंद्रावर क्रीडा साहित्य व आर्थिक सहाय्य देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१२७) " राज्यात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी नगरपालिका स्थापन करण्याचा निर्णय शासनाने जाहीर करणे, त्यानुसार नगरपंचायती व नगरपालिकांची निर्मिती होणे, त्यामुळे नगरपालिकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढणे, राज्यातील प्रत्येक विभागीय स्तरावर नगरपालिका प्रशासन सक्षमपणे चालविण्यासाठी विभागीय स्तरावर नगरपालिका आयुक्तालय स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १२८, १२९, १३० व १३१

(१२८) " महाराष्ट्र राज्यातील कायमविना अनुदान तत्वावरील २००१ पूर्वी मान्यता असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोयीसुविधांसाठी या महाविद्यालयांना १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१२९) " दादर, मुंबई येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चैत्यभूमी येथे स्मारक असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्त्यव्य दादर येथे हिंदू कॉलनीत राजगृह येथे होते, आताही राजगृहात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वस्तु ठेवण्यात आलेल्या असणे, दिनांक १४ एप्रिल व ६ डिसेंबर या दिवशी या महामानवाचे नाव चिरंतर स्मरणात रहावे यासाठी दादर रेल्वेस्थानकाला 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वेस्थानक' असे नाव द्यावे अशी राज्यातील सर्व अनुयायी यांची फार पूर्वीपासून मागणी आहे, दादर रेल्वेस्थानकाला 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर' रेल्वे स्थानक असे नाव द्यावे, अशी शिफारस केंद्र शासनाला करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१३०) " महाराष्ट्र राज्य हे प्रगतीशील राज्य असून राज्यातील शेतकरी व शेतमजूर उत्पादन वाढवून मेहनतीने व कष्टाने घाम गाळून शेतीची मशागत करून राज्याच्या विकासात हातभार लावतो, परंतु राज्यात अवकाळी पाऊस, दुष्काळ व नैसर्गिक आपत्ती आल्यामुळे शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढले असून त्यांचे जीवन जगणे कठीण झाले असणे, म्हणून राज्यातील शेतकऱ्यांना किमान रु. २००० प्रति महिना निवृत्तीवेतन देण्याची योजना सुरू करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१३१) " महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात लाखो विद्यार्थी शिक्षण घेत असणे, विद्यार्थ्यांच्या राज्यभर जिल्हा स्तरीय वेगवेगळ्या क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक नाट्य, वादविवाद स्पर्धा शासनातर्फे आयोजित केल्या जातात, परंतु या विद्यार्थ्यांना जिल्ह्यांच्या ठिकाणी निवासाची व्यवस्था नसल्यामुळे स्पर्धेचे यशस्वी आयोजन होत नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांवर अन्याय होत असणे, विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्याकरीता प्रत्येक जिल्हयात शासनातर्फे महात्मा ज्योतिबा फुले विद्यार्थी भवन बांधण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

श्री. अमरसिंह पंडित वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १३२, १३३, १३४, १३५ व १३६

(१३२) " राज्यात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी नगरपालिका स्थापन करण्याचा निर्णय शासनाने जाहिर करणे, त्यानुसार नगर पंचायती व पालिकांची निर्मिती होणे, यामुळे नगरपालिकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढणे, राज्यातील प्रत्येक विभागीय स्तरावर नगरपालिका प्रशासन सक्षमपणे चालविण्यासाठी नगरपालिका आयुक्तालय स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१३३) " राज्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम आणि शिस्त निर्माण व्हावी यादृष्टीने राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयात एन.सी.सी. चा अभ्यासक्रम किंवा त्या धर्तीवर एम.सी.सी. चा अभ्यासक्रम अनिवार्य करावा व प्रत्येक शाळा, महाविद्यालयात त्याचे शिक्षण सर्व विद्यार्थ्यांना अनिवार्य करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१३४) " सामुहिक विवाह सोहळ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून अशा सामुहिक विवाह सोहळ्यात विवाहबद्ध होणाऱ्या सर्वधर्मीय दाम्पत्यांना आणि सामुहिक विवाह सोहळे आयोजित करणाऱ्या सेवाभावी संस्थांना पुरेसे अर्थसहाय्य तसेच अनुदान देण्याची योजना शासनाने त्वरीत आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१३५) " राज्यात विशेषतः मराठवाड्यात सतत निर्माण होणारी भीषण दुष्काळ आणि तीव्र पाणी टंचाई परिस्थिती लक्षात घेता दुष्काळ निवारणार्थ करावयाच्या कायमस्वरुपी उपाययोजना, मराठवाड्यात शाश्वत शेतीसाठी सिंचन अभियान सुरु करून मराठवाड्यातील सिंचनाचा जल आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मराठवाड्यासाठी सक्षम जल आयुक्तालय सुरु करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१३६) " राज्यातील विशेषतः मराठवाड्यातील सर्व गावे बारमाही वाहतुकीस योग्य व्हावीत, नद्या, नाले व मोऱ्या यांच्यावरील पुलांची बांधकामे व दुरुस्ती करून ग्रामीण भागातील रस्ते वाहतुकी योग्य करण्यासाठी धडक योजना शासनाने हाती घ्यावी आणि जिल्हा

स्तरावर रस्त्याच्या अंतराच्या प्रमाणात ग्रामीण रस्त्याच्या दुरुस्ती आणि मजबुतीकरणासाठी निधी उपलब्ध करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

प्रा. अनिल सोले, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १३७ व १३९

(१३७) "राज्यात औद्योगीक वसाहती व कारखान्यांचे वाढते प्रमाण त्यामुळे बहुतांश जिल्ह्यात वायू प्रदूषण व जल प्रदूषणाची समस्या निर्माण झालेली असणे, कोळसाखाणी पासून होत असलेले प्रदूषण, लहान मोठे उद्योजक त्यात थर्मल पॉवर स्टेशन, एम.आय.डी.सी.तील उद्योग, सिमेंट कारखाने, पेपर मिल, या पासून होत असलेले प्रदूषण, उद्योजक करारनामा करूनही देखील नियम पाळत नसणे, विशेषतः ज्या भागात दुर्मिळ वनसंपदा तसेच वन्यजीवाचे वास्तव्य आहे त्या भागात कोळसा खाणीसाठी परवानगी देण्याचा चाललेला प्रकार, त्यामुळे वन व वन्यजीवाचे अस्तित्व धोक्यात येणे, त्यातच शासनाला अपुऱ्या साधनसामुग्रीमूळे प्रदूषणावर आळा घालण्याकरीता येत असलेले अपयश, परिणामी जनतेच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, याकरीता शासनाने विशेषयंत्रणा निर्माण करावी तसेच पर्यावरणाचा होणारा ऱ्हास लक्षात घेता आरक्षित वनांच्या ठिकाणी देण्यात आलेले कोलब्लॉक्स रद्द करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१३९) "राज्यात विशेषतः विदर्भात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत, त्यात काही उद्योजकांनी जागा खरेदी करून तेथे कोणताही उद्योग सुरू केलेला नाही, नागपूर विभागात २६८७ उद्योग सुरू असून त्यातून केवळ ०.७१ हजार एवढाच रोजगार उपलब्ध आहे, अमरावती विभागात १५८९ उद्योग सुरू असून त्यातून केवळ ०.१९ हजार रोजगार उपलब्ध आहे, बुटीबोरी नागपूर विभाग या पंचतारांकित औद्योगिक वसाहतीत १९९९ पासून नवीन उद्योग येण्याचे बंद झाले आहे, तसेच बुटीबोरी येथील निवासी भूखंडांची एकूण ५३,५३६ चौ.मी. जागेची अतिरिक्त मागणी एप्रिल, २०११ ला प्रस्ताव पाठवूनही परवानगी मिळाली नाही, वर्धा एम.आय.डी.सी.तील ५० टक्के जागा उद्योजकांनी घेऊनही १० टक्के उद्योग अद्याप सुरू न होणे, ३ टक्के उद्योजकांनी केवळ निवासी बंगले बांधून जागेचा केलेला गैरव्यवहार, परिणामी बेरोजगारांना रोजगार मिळेल हा शासनाचा उद्देश सफल झालेला नसल्याने या सर्व बाबींचा आढावा घेऊन यात कायमस्वरुपी ठोस उपाययोजना राबविण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

श्री. जगन्नाथ शिंदे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १४१, १४२ व १४४

(१४१) " राज्यात वेळावेळी पडणाऱ्या दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता, पावसाळा संपत असतानाच पुढील वर्षभरासाठी राज्यातील पाणीसाठा जतन करण्याची आवश्यकता असणे, राज्यातील जनतेला लागणारे पिण्याचे पाणी, शेतीसाठी लागणारे पाणी, औद्योगिक वसाहती व कारखान्यांना आणि अन्य घटकांना लागणा-या पाण्याचे न्याय वाटप होऊन प्रत्येकाला पुरेसे पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सुरुवातीपासूनच विभागवार घेतली जाणारी पिके त्या भागातील उपलब्ध पाणीसाठा, लोकसंख्या यांचा विचार करून प्रत्येक घटकाला वर्षभर पाणी कसे पुरेल याबाबत पूर्वनियोजन करून त्याची शासन स्तरावर काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करत आहे."

(१४२) " मुंबई शहर, उपनगर आणि ठाणे जिल्ह्यासह राज्याच्या सर्वच प्रमुख शहरांत डंपिंग ग्राउंड व घनकचरा विघटनाच्या समस्यांनी उग्र रूप धारण करणे, सर्वच शहरातील डंपिंग ग्राउंड लगतच्या नागरिकांना होणाऱ्या त्रासामुळे जनक्षोभ वाढत असणे, राज्यातील सर्वच शहरांच्या डंपिंग ग्राउंड व शास्त्रोक्त पद्धतीने घनकचरा निर्मुलन आणि व्यवस्थापनाबाबत शासनस्तरावर कृती आराखडा तयार करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने तातडीने ठोस कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१४४) " राज्यातील कोणतीही व्यक्ती उपचारा अभावी जीवानिशी जाता कामा नये या तत्वानुसार राज्य शासनाने सुरु केलेली १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका सेवा रुग्णाला धरून शासकीय रुग्णालयात अथवा शासकीय रुग्णालयातून दुसऱ्या शासकीय रुग्णालयात नेण्यासाठी मर्यादित असल्याने, अनेकदा प्राथमिक गरज लक्षात घेऊन गोर-गरीब रुग्णांना नातेवाईक अथवा जवळच्या व्यक्ती नजीकच्या रुग्णालयात दाखल करतात, मात्र नंतर त्या रुग्णालयाचा वाढता खर्च लक्षात घेता अशा रुग्णांना शासकीय रुग्णालयात स्थलांतरित करताना १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेची सेवा शासकीय नियमानुसार उपलब्ध करून दिली जात नाही, तरी रुग्णांच्या नातेवाईक व रुग्णांची तात्कालीक अवस्था लक्षात घेता प्राथमिक उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल केलेल्या रुग्णांना किमान शासकीय रुग्णालयात स्थलांतरित करण्यासाठी १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका शासनाने विनाविलंबब उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

श्री. गिरीशचंद्र व्यास, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १४५, १४६, १४७, १४८ व १४९

(१४५) "राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असण्याची आवश्यकता असणे, जेणेकरून तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या ग्रामीण भागातील जनतेला त्याच्या कामासाठी वेगवेगळ्या कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार

नाही तसेच आर्थिक भुर्दंडही सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(१४६) “ महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात लाखो विद्यार्थी शिक्षण घेत असणे, विद्यार्थ्यांच्या राज्यभर जिल्हास्तरीय वेगवेगळ्या क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक, नाट्य, वादविवाद स्पर्धा शासनातर्फे आयोजित केल्या जाणे, परंतु या विद्यार्थ्यांना जिल्ह्यांच्या ठिकाणी निवासाची व्यवस्था नसल्यामुळे स्पर्धेचे यशस्वी आयोजन होत नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांवर अन्याय होत असणे, त्यांची गैरसोय टाळण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यात शासनाततर्फे विद्यार्थी भवनाची उभारणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(१४७) “ राज्यात विशेषतः मराठवाड्यात सतत निर्माण होणारा भीषण दुष्काळ आणि तीव्र पाणी टंचाईची परिस्थिती लक्षात घेता दुष्काळ निवारणार्थ मराठवाड्यात शाश्वत सिंचन अभियान सुरू करून मराठवाड्यातील सिंचनाचा जल आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मराठवाड्यासाठी सक्षम जल आयुक्तालय सुरू करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(१४८) “ राज्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम आणि शिस्त निर्माण व्हावी यादृष्टीने राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयात एन.सी.सी.चा अभ्यासक्रम किंवा त्या धर्तीवर एम.सी.सी.चा अभ्यासक्रम अनिवार्य करावा व प्रत्येक शाळा, महाविद्यालयात त्याचे शिक्षण सर्व विद्यार्थ्यांना अनिवार्य करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(१४९) “ राज्यात विशेषतः विदर्भात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त असणे, त्यात काही उद्योजकांनी जागा खरेदी करून तेथे कोणताही उद्योग सुरू केलेला नसणे, नागपूर विभागात २६८७ उद्योग सुरू असून त्यातून केवळ ०.७१ हजार एवढाच रोजगार उपलब्ध असणे, अमरावती विभागात १५८९ उद्योग सुरू असून त्यातून केवळ ०.१९ हजार रोजगार उपलब्ध असणे, बुटीबोरी नागपूर विभाग या पंचतारांकित औद्योगिक वसाहतीत १९९९ पासून नवीन उद्योग येण्याचे बंद झाले असणे, तसेच बुटीबोरी येथील निवासी भूखंडांची एकूण ५३,५३६ चौ.मी. जागेची अतिरिक्त मागणी एप्रिल, २०११ ला प्रस्ताव पाठवूनही परवानगी मिळाली नसणे, वर्धा एम.आय.डी.सी.तील ५० टक्के जागा उद्योजकांनी घेऊनही १० टक्के उद्योग अद्याप सुरू न होणे, ३ टक्के उद्योजकांनी केवळ निवासी बंगले बांधून जागेचा केलेला गैरव्यवहार, परिणामी बेरोजगारांना रोजगार मिळेल हा शासनाचा उद्देश सफल झालेला नसल्याने या

सर्व बाबींचा आढावा घेऊन यात कायमस्वरुपी ठोस उपाययोजना राबविण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

श्री. अनिल भोसले वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १५०, १५१, १५२, १५३ व १५४

(१५०) “ राज्यातील शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ, अल्प प्रमाणातील महागडे मजूरवर्ग, सिंचनासाठीच्या पाणी दरामध्ये सतत होणारी वाढ, सवलतीच्या दरात शेतीपंपास वीजपुरवठा न मिळणे, जनावरांच्या तुलनेत शेतीकामात यंत्राचा वापर वाढल्याने शेती सामग्रीतील अवाढव्य वाढ, नैसर्गिक व जैविक शेती उत्पादन प्रयोगास पुरेसे संरक्षण विचारात न घेणे, या सर्व बाबी विचारात घेता उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव ठरविण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(१५१) “ राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणीटंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणीटंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(१५२) “ राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणात अपघात होत असणे, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालय नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्ग येथे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्र सुरू झाल्यास येथे वैद्यकीय अधिकारी, स्टाफ, नर्सेस व इतर कर्मचारी नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळून राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होईल तसेच अपघातग्रस्तांना वेळीच उपचार होतील म्हणून राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक आपत्कालीन उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(१५३) “ राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी भाविकांची अफाट गर्दी होत असणे, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखांच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयीसुविधांही उपलब्ध करून दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांचा मृत्यू होणे,

यामध्ये अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याच्यादृष्टीने तशा योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१५४) '' छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाची गौरवगाथा सांगणाऱ्या किल्ले रायगडाच्या नुतनीकरणासाठी सातत्याने पाठपुरावा करूनही त्याकडे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने दुर्लक्ष केले असणे, रायगड, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग या किल्ल्यांसह राज्यातील प्रमुख किल्ल्यांचे नुतनीकरण करणे, तसेच राज्यातील अन्य किल्ल्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याची परवानगी राज्य शासनाला द्यावी याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे प्राध्यान्याने आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १५६, १५७ व १५८

(१५६) '' शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१५७) '' राज्यात विशेषत: विदर्भात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त असणे, त्यात काही उद्योजकांनी जागा खरेदी करून तेथे कोणताही उद्योग सुरू केलेला नसणे, नागपूर विभागात २६८७ उद्योग सुरू असून त्यातून केवळ ०.७१ हजार एवढाच रोजगार उपलब्ध असणे, अमरावती विभागात १५८९ उद्योग सुरू असून त्यातून केवळ ०.१९ हजार रोजगार उपलब्ध असणे, बुटीबोरी, नागपूर विभाग या पंचतारांकित औद्योगिक वसाहतीत १९९९ पासून नवीन उद्योग येण्याचे बंद झाले असणे, तसेच बुटीबोरी येथील निवासी भूखंडांची एकूण ५३,५३६ चौ.मी. जागेची अतिरिक्त मागणी एप्रिल, २०११ ला प्रस्ताव पाठवूनही परवानगी मिळाली नसणे, वर्धा एम.आय.डी.सी.तील ५० टक्के जागा उद्योजकांनी घेऊनही १० टक्के उद्योग अद्याप सुरू न होणे, ३ टक्के उद्योजकांनी केवळ निवासी बंगले बांधून जागेचा केलेला गैरव्यवहार, परिणामी बेरोजगारांना रोजगार मिळेल हा शासनाचा उद्देश सफल झालेला नसल्याने या सर्व बाबींचा आढावा घेऊन यात कायमस्वरुपी ठोस उपाययोजना राबविण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१५८) '' राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध,

त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी, इ.बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १५९, १६१, १६२ व १६३

(१५९) “ राज्यातील ऊसतोड कामगार वर्षातील आठ महिने ऊस तोडणीसाठी घराबाहेर राहत असणे, त्यामुळे त्यांच्यासोबत त्यांचे संपूर्ण कुटुंबही ऊस तोडणीसाठी स्थलांतरित होत असल्यामुळे त्यांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असणे, या ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी त्यांच्या स्थलांतराच्या ठिकाणी ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी निवासी शाळा सुरू कराव्यात, ऊसतोडणी कामगारांच्या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी शासकीय वसतिगृहांमधून निवासाची व भोजनाची मोफत व्यवस्था करावी, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या धर्तीवर ऊसतोडणी कामगारांच्या मुलांना शाळा, महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(१६१) “ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक, राजकीय क्षेत्रातील महान कार्याचा विचार करता त्यांचे छायाचित्र भारतीय चलनी नोटांवर छापण्याचा राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(१६२) “ महाराष्ट्रातील गड-किल्ले हा महाराष्ट्राच्या शौर्याचा जीवंत इतिहास असणे, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने हे गडकिल्ले पावन झालेले असणे, मराठी साम्राज्यातील अनेक शुरवीरांनी गाजवलेल्या शौर्याचे हे गड-किल्ले साक्षीदार असणे, सध्या भग्नावस्थेत असलेल्या या गडकिल्यांचं जतन हे महाराष्ट्राच्या इतिहासाचे व सांस्कृतिक वारसा संवर्धनाचे सर्वात महत्वाचे कार्य असणे, या गडकिल्ल्यांची डागडूजी, जतन व संवर्धनाचे कार्य तातडीने हाती घेवून पुर्ण करण्यासंदर्भात राज्य शासनाने केंद्र सरकारकडे आग्रह धरावा व पुरेसा निधी उपलब्ध करण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(१६३) “ महाराष्ट्र राज्याच्या वर्धा, चंद्रपूर जिल्ह्यासह काही भागात दारुबंदी लागू करण्यात आलेली असणे, गुजरात, बिहार, उडिसासह अनेक राज्यांमध्ये संपूर्ण दारुबंदी लागू असणे, याच धर्तीवर महाराष्ट्र राज्यात संपूर्ण दारुबंदी करण्याबाबत सातत्याने मागणी होत असणे, अनेक महिला संघटनांनी गाव, तालुका व जिल्हा पातळीवर आंदोलने करून दारुबंदीची मागणी केलेली असणे, या मागणीची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असणे, दारुमुळे लाखो कुटूंबे उद्ध्वस्त होत असून सामाजिक स्वास्थ्यासाठी हा फार मोठा धोका

असणे, माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये जिल्हा परिषदेच्या निवडणूककाळात नगर जिल्ह्याच्या जेऊर गटातील पांगरमल गावात विषारी दारुमुळे अकरा जणांचा बळी गेलेला असणे, सन २०१५ मध्ये मुंबईतल्या मालाड-मालवणी भागात विषारी दारुमुळे १०५ जणांना प्राण गमवावे लागणे, सन २००४ मध्ये मुंबइतील विक्रोळी भागात शंभरहून अधिक जणांचा विषारी दारुमुळे मृत्यू होणे, दारु पिऊन वाहन चालवल्यामुळे होणाऱ्या अपघातात वाहनचालकासह निरपराध नागरिकांना जीव गमवावा लागत असणे, युवकांमध्ये वाढलेले दारुचे व्यसन ही देखील गंभीर समस्या निर्माण होणे, दारु ही नागरिकांसाठी, विशेषतः युवा पिढीसाठी विनाशकारी ठरत असणे, दारुमुळे उद्भवणाऱ्या समस्यांच्या नियंत्रण व निर्मूलनासाठी वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यांप्रमाणेच संपूर्ण राज्यात दारुबंदी लागू करण्यात यावी, तसेच यापूर्वी यासंदर्भात देण्यात आलेल्या अनुज्ञप्त्या व परवाने रद्द करण्यात यावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

वीस : सर्वसाधारण सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबी.

एकवीस : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी स्वतंत्रपणे वितरित करण्यात आली आहे.)

विधान भवन,
मुंबई,
दिनांक २४ जुलै २०१७.

डॉ. अनंत् कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधान~~सभा~~ परिषद